Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

| VOL- VIII | ISSUE- VII | JULY | 2021 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.149 | ISSN 2349-638x |
|---|---|---|---|---|---|---|

# सार्वजनिक ग्रंथालये : लोकशिक्षणाचे केंद्र

**प्रा. रामकृष्ण सुर्यकांत गडकरी**
ग्रंथपाल
र.भा. माडखोलकर महाविद्यालय,
चंदगड, जिल्हा– कोल्हापूर

**प्रस्थावना:**

समता, न्याय, स्वातंत्र्य, बंधुता, एकता या सर्व तत्वांवर समाज मार्गक्रमण करत असतो. समाज मनाचा विकास होत असतो. ग्रंथालय ही एक सामाजिक संस्था आहे. ज्ञानाआधारीत समाजाची माहितीची गरजपूर्ण करण्यासाठी ग्रंथालयांचे मोलाचे योगदान आहे. समाजाच्या बौधिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक इ. विकासामध्ये ग्रंथालये महत्वाची भुमिका पार पाडत असतात. विशोता सार्वजनिक ग्रंथालये ही लोकांनी लोकांसाठी व शासकीय अनुदानावर चालनारी असतात. समाजातील विविध घटकांची माहितीची गरज व मनोरंजन ही महत्वाची कार्य सार्वजनिक ग्रंथालये पार पाडत असतात. ही ग्रंथालये समाजाशी जोडलेली असतात, समाजाच्या मानसिक, बौधिक विकास तसेच लोकशाहीची नितिमुल्ये व त्यांचे संरक्षण व संवर्धन करत असतात.मानव आपले आचार, विचार, सामाजिक मुल्य, नितिमत्ता, हक्क, यासाठी संघर्ष करत असतो. समाजामध्ये समता, न्याय, स्वातंत्र, बंधुता, एकता या सर्व या सर्व प्रक्रीयेमध्ये सार्वजनिक ग्रंथालये मोलाचे योगदान देतात.

**सार्वजनिक ग्रंथालय :**

मानवी जीवनाच्या विकास होण्यासाठी शिक्षण अत्यंत महत्वाचे आहे. औपचारीक, अनौपचारीक किंवा व्यावसायिक शिक्षणाच्या माध्यमातुन मानव शिक्षण घेत असतो. मानवाच्या विकासात शिक्षणाची मुख्य भुमीका असते. शिक्षणाची मुक्त सुविधा नसेल तर मानव शिक्षित व ज्ञानी होत नाही. निरंतर शिक्षण, दूरशिक्षण आणि मुक्त शिक्षण पध्दतीमध्ये ग्रंथालयांना विशेष महत्त्व आहे. या शिक्षण पध्दतीमध्ये वाचनसाहित्य आणि पर्यायाने ग्रंथालय हेच शिक्षणाचे प्रमुख साधन असते. नवीन ज्ञान देणे, कौशल्ये विकसित करणे, दृष्टीकोन विकसित करणे, मुल्ये व त्यांचे महत्त्व सांगणे इ. शिक्षणाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी ग्रंथालयांची महत्त्वाची भूमिका असते. आपण पाहतो की, ग्रंथालयांनी आपले सेवा व सुविधांमध्ये दर्जात्मक व गुणात्मक विकास केला आहे. पारंपारिक सेवांबरोबरचं ग्रंथालये आधुनिक माहितीच्या सेवा देत आहेत. मानवी इतिहासामध्ये शिक्षण व ग्रंथालये यांचा एकत्रित विकास झालेला दिसतो. ज्या ठिकाणी ग्रंथालय सेवांची उणीव असते तेथे शिक्षणाचाही अभाव असतो. शिक्षण घेत असतांना प्रत्यक्ष मार्गदर्शन व आधिक ज्ञान संपादन करण्यासाठी ग्रंथालये मदत करतात. विद्यार्थ्यींनी तसेच सर्व सामान्य जतनेची माहितीची गरज पुर्ण करण्याचे कार्य सार्वजनिक ग्रंथालय करत असतात. म्हणून लोक शिक्षणात सार्वजनिक ग्रंथालयांचा वाटा मोठा असतो.

समाजातील सर्व घटकांपर्यंत ज्ञानाचे संप्रेषण करणे, औपचारिक, अनौपचरिक शिक्षणामध्ये मदत करणे प्रत्येक समाजाचा, सांस्कृतिक वारसा लिखाणाच्या स्वरूपात जतन करणे व पुढील पिढीला सुर्पूत करणे अशा अनेक जबाबदाऱ्या ग्रंथालये पूर्ण करीत असतात.

**सार्वजनिक ग्रंथालय**

**व्याख्या :**

"ज्या ग्रंथालयाची स्थापना कायदयाच्या पाठिंब्याने होते. ज्याचे व्यवस्थापन संपूर्णपणे सार्वजनिक खर्चातून होत. त्यासाठी वाचकाकडून कोणतेही प्रत्यक्ष शुल्क घेतले जात नाही आणि सर्वांना समान हक्काने व विनाशुल्क वाचनसाहित्य वापरता येते ते सार्वजनिक ग्रंथालय होय."

**युनेस्कोची व्याख्या**

" सार्वजनिक ग्रंथालयांची जास्तीत जास्त व्यापक व सर्वांना ग्राहय होऊ शकणारी अशी व्याख्या युनेस्को या संस्थेने सन १९४९ मध्ये ती अधिक बिनचूक करण्याचा प्रयत्न

करण्यात आला. युनेस्कोच्या सार्वजनिक ग्रंथालयाच्या जाहीरनाम्यात प्रसिद्ध झालेली ही व्याख्या पुढील प्रमाणे आहे.

सार्वजनिक ग्रंथालय म्हणजे –

१) त्यावरील खर्चाचा मोठा हिस्सा हा सार्वजनिक निधीतून जमा होत असतो;

२) ग्रंथालय मुक्तद्वार असते व सर्व जाती – धर्माच्या वाचकांना, कोणताही भेदभाव न करता मोफत ग्रंथालयीन सेवा दिली जाते.

३) ग्रंथालयाचे स्वरूप एखाद्या स्वयंसेवी शैक्षणिक संस्थेसारखे असते. तेथे निरंतर शिक्षण देण्याची कामगिरी सातत्याने होत असते.

४) वाचकांना विविध विषयांवरील जास्तीत जास्त माहिती, कोणत्याही पूर्वग्रहांशिवाय निरपेक्षपणे उपलब्ध करून दिली जाते. त्यासाठी विविध शैक्षणिक व माहिती प्रदान करणारी साधने एकत्रित केलेली असतात.

विविध सामाजिक सांस्कृतिक उपक्रम हाती घेतले जातात.''

**सार्वजनिक ग्रंथालयाचे स्वरूप पुढीलप्रमाणे स्पश्ट करता येते :**

- सार्वजनिक ग्रंथालय म्हणजे स्थानिक माहिती केंद्र असते. त्याचा उपयोग करणा–यांना सर्वप्रकारचे ज्ञान व
- महिती उपलब्ध होते.
- वय, लिंग, जात, धर्म, राष्ट्रीयत्व, भाषा किंवा सामाजिक दर्जा यांपैकी कशाचाही भेदभाव न करता, सर्वांना
- समभावनेने सेवा देणारी ही ग्रंथालये असतात.
- भाषोच्या दृष्टीने अल्पसंख्याक, अपंग, रूग्ण किंवा कैदी यांना स्वतंत्र प्रकारची सेवाही या ग्रंथालयांकडून मिळू शकते.

सार्वजनिक ग्रंथालयामध्ये सर्वांना मुक्त प्रवेश असतो. भेदभाव विरहीत, स्त्री–पुरूष, बाल– प्रौढ असे कोणत्याही भेदभावाला ग्रंथालयामध्ये स्थान नसते. समता बंधुता, एकता या सामाजिक मुल्यांवर ग्रंथालयांचे कार्य चालत असते. त्यामुळे सामाजिक सामाजिक मुल्याचे रक्षणकरणे हे सार्वजनिक ग्रंथालयाचे कार्य करण्याचे तत्व आहे. डॉ. एस. आर. रंगनाथन यांचे ग्रंथालयशास्त्राचे पाच सिंध्दांत सामाजिक मुल्यांच्या रक्षणासाठी उपयुक्त आहेत.

१. ग्रंथ हे उपयोगासाठी आहेत.
२. प्रत्येक वाचकाला त्याचा ग्रंथ मिळावा
३. प्रत्येक ग्रंथाला वाचक मिळावा
४. वाचकांचा वेळ वाचावा
५. ग्रंथालय वर्धिष्णू आहे.

वरील पाच तत्वांवर ग्रंथालयांचे कार्य चालत असते.

**सार्वजनिक ग्रंथालयांची कार्य :**

सामाजिक पर्यावरण रक्षण करण्याच्या दृ टीकोनातून सार्वजनिक ग्रंथालयाचे योगदान पाहत असतांना त्यांचे कार्य पाहणे आवश्यक आहे. खालील विविध कार्य करतात.

१. शैक्षणिक कार्य
२. सांस्कृतिक कार्य
३. माहिती पुरविण्याचे कार्य
४. मनोरंजनात्मक कार्य

**१. शैक्षणिक कार्य**

औपचारिक, अनौपचारिक, प्रौढ व निरंतर अशा अनेक मार्गाने शिक्षण घेतले जाते. अशा प्रकारच्या शिक्षणाला व संशोधनाला सार्वजनिक ग्रंथालये मदत करत असतात. म्हणून सार्वजनिक ग्रंथालये हे एक शैक्षणिक केंद्र मानले जाते.

**२. सांस्कृतिक कार्य**

मानवाची वैचारिक प्रगल्बता वाचन व विचार यामुळे वाढीस लागते. मानसिक पातळीवरील विचाराच्या कक्षा रूंदावतात व मानवाच्या विधायक क्षमतेचा विकास होतो. सार्वजनिक ग्रंथालयामधे विविध वाचन साहित्य उपलब्ध असते. वरील प्रक्रीयेला त्यामुळे मदत होते.

सार्वजनिक ग्रंथालया मार्फत विविध सामाजिक उपक्रम, कार्यक्रम यांचे आयोजन केले जाते. त्यामुळे समाजातील अनेक घटक एकत्र येतात आणि विचारांची देवघेव होते. त्यामुळे सांस्कृतिक देवघेव होत असते.

बदलत्या संस्कृतीचे प्रतिबंब वाचन साहित्यातून प्रतिबिंबीत होत असते. एकापिढीतील ज्ञान दुसऱ्या पिढीकडे शतकानुशतके प्रवाहीत होत असते असे ज्ञान सार्वजनिक ग्रंथालय जतन करून ठेवतात.

**३. माहिती पुरविण्याचे कार्य**

समाजातील सर्व घटकांना माहिती पुरविण्याचे प्रमुख कार्य सार्वजनिक ग्रंथालये करत असतात. विविध माहितीच्या सेवा व साधने ग्रंथालयामध्ये उपलब्ध करून दिली जातात.

**४. मनोरंजनात्मक कार्य**

मानवाला दररोजच्या धावपळीच्या जिवनात मनोरंजनाची आवश्यकता असते. तसेच रिकाम्यावेळीचा सदुपयोग करण्याची संधी उपलब्ध असावी लागते. कामाच्या जबाबदाऱ्या व ताण यांनी शिणलेल्या जनतेला कथा, कादंबऱ्या, नियतकालीके, वृत्तपत्रे असे वाचन साहित्य देवून त्यांचे मनोरंजन करण्याचे कार्य ग्रंथालये करतात. तसेच दृक–श्राव्य साधने (Audio visual aids) उपलब्ध केली जातात.

अशी विविध कार्य सार्वजनिक ग्रंथालये करत असतात.

सार्वजनिक ग्रंथालये जनतेसाठी विविध विस्तार कार्य, उपक्रम राबवित असते यामधुन समाजाच्या सर्व घटकाची बौद्धिक व मानसिक जडण घडण होत असते.

१. व्याख्याने
२. चर्चासत्रे
३. कार्यशाळा
४. ग्रंथप्रदर्शन
५. सांस्कृतिक मेळावे
६. साहित्य संमेलन इ.

वरिल विस्तार कार्य सार्वजनिक ग्रंथालये राबवित असतात.

समाजातील सर्व घटकांना विविध माहितीच्या साधनाद्वारे सेवा देण्याचे कार्य सार्वजनिक ग्रंथालये करीत असतात. सामाजिक, बौद्धिक, सामाजिक, शैक्षणिक जडणघडण या लोक विद्यापीठाकडून होत असते. या सेवाभावी वृत्तीमुळे सार्वजनिक ग्रंथालये ही लोकशिक्षणाची केंद्रे म्हणून महत्वाचे जबाबदारी पार पाडतात. समाजाला नैतिकता, सामाजिक मुल्य, बौद्धिक विकास या व्दारे सामाजिक मुल्यांच्या रक्षणाचे कार्य प्रभावीपणे करत असतात.

**संदर्भ :–**

1. डायमंड ग्रंथालय व माहितीशास्त्र कोष (२००८) संपा. कोण्णूर एम. बी, कोण्णूर सुजाता, आणि माणगांवकर उशा:प्रभा , डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.
2. ग्रंथालय संदर्भ सेवा : तात्विक व प्रात्यक्षिक (२००३) साखरे राजेंद्र रमाकांत, युनिव्हर्सल प्रकाशन, पुणे.
3. नरगुंडे रवेती, (२००७) ग्रंथालये आणि सामाजिक विकास: युनिव्हर्सल प्रकाशन, पुणे.
4. ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनिकीकरण (२०१०) फडके द. ना. युनिव्हर्सल प्रकाशन, पुणे.
5. ग्रंथालयाचे विविध प्रकार व त्यांची कार्ये (२०१४) अनु. देशपांडे ए. व्ही. य.च.म.मु.विद्यापीठ नाशिक.
6. Ranganathan,S.R(2006)The five lows of library science :Ess ess publication.New Delhi.
7. https://en.wikipedia.org/wiki/
8. https://marathivishwakosh.maharashtra.gov.in/